**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६४/२०१६-१७/१६३ दिनांक: २७.०४.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ६४/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अमोल शिवाजी माने :<br>मु. पो. कुडनूर<br>ता. जत, जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग कवठे महाकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) शेती पंपासाठी नविन वीज जोडणी आणि झालेल्या विलंबाची वि.प.कडून भरपाई वसूल होऊन मिळणेसाठी सदरचे गा-हाणे उपरोक्त तक्रारदार यांनी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) तक्रारदार यांनी त्यांच्या कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात रितसर अर्ज सादर करुन कोटेशनप्रमाणे आवश्यक ती रक्कम दि. ११-०७-२०१३ रोजी भरणा केली. कृती मानके विनियमातील तरतूदीनुसार तक्रारदार यांना दि. १०.०८.२०१४ पर्यन्त वीज जोडणी मिळणे जरुर होते. सदर मुदतीत वीज जोडणी न मिळाल्याने तक्रारदार यांनी दिनांक ३१.०१२.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष , सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. दिनांक १४.०२.२०१७ च्या निर्णयाने , तक्रारदार यांना जेष्ठता यादीनुसार नविन वीज जोडणी देणेत यावी असा आदेश सदर कक्षाने जाहिर केला. त्यावर नाराज होऊन प्रस्तुतचे अपिल तक्रारदार यांनी दिनांक १४.०३.२०१७ रोजी मंचासमोर दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) तक्रारदार यांना वीज जोडणी देण्यासाठी रोहित्र ६३ के.व्ही.ए. जादा रोहित्र उभारणीसाठी ०.४८ कि.मी. उच्च दाब वाहिनी आणि पाच पोलची लघु दाब विद्युत वाहिनी यांची आवश्यकता आहे. तक्रारदार यांचा प्रतिक्षा यादीत १३१ वा क्रमांक आहे. त्यांना प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या नैसर्गिक न्यायतत्वावर जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देणेत येईल.

४) या प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दि. १८.०४.२०१७ रोजी घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे श्री हरिभाऊ खापरे प्रतिनिधी यांचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. वि.प.तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री आर.एम. शेमडे व सहाय्यक अभियंता श्री उमेश माने यांचे तोंडी निवेदन ऐकण्यात आले सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना निश्चित कालावधीमध्ये शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार यांना वीज जोडणी देण्यात झालेल्या विलंबासाठी भरपाई देणेचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- मागणी सोडून देणेत आली आहे.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी त्यांना कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज वि.प. कडे सादर करुन दि.११.०७.२०१३ रोजी रु. ६,१००/- जमा केले याबद्दल वाद नाही. वर परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्च व लघुदाब वाहिनीचा विस्तार व रोहित्राची आवश्यकता त्यांना नविन वीज जोडणी देणेसाठी आहे असे वि.प. यांनी नमूद केले आहे. तक्रारदार यांनी गा-हाणे अर्जात स्पष्टपणे नमूद केले आहे की, नियमानुसार त्यांना एक वर्षात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. तक्रारदार यांचा संगणकीय प्रतिक्षा यादीमध्ये १३१ वा क्रमांक नमूद आहे.प्रतिक्षा यादीपैकी दि. ३१.०३.२०१३ पर्यन्तच्या ग्राहकांसाठी वीज वाहिनी उभारणेकरिता कार्य कंत्राटी आदेश देणेत आले आहेत. वि.प. यांच्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांना जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देणेत येईल.

७) कृति मानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना एक वर्षात नविन वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. सदर तरतूदीनुसार जर मुदतीत वीज पुरवठा देणेत आला नाही तर पुढे होणा-या विलंबासाठी प्रति आठवडा १०० रु.भरपाई देणेत यावी असे नमूद केले आहे. इतकेच नाही तर विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) यामध्ये वितरण परवाना धारकास दंड ठोठावण्याची तरतूद केंद्र शासनाने केली आहे. नविन वीज जोडण्या देणे बाबतीत जर वितरण कंपनीस अडचणी येत असतील तर त्याचे निवारण मा. विद्युत नियामक आयोगाकडून करुन घेणे अनिवार्य आहे. प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य किंवा जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देणे या तत्वांचा वापर या ठिकाणी करता येत नाही. सदर तत्वे, वर नमूद केलेल्या कायद्यामधील कठोर तरतूदीपुढे गौण ठरतात. विलंबाच्या भरपाईची मागणी मात्र तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी युक्तिवादाचे वेळी सोडून दिली आहे.

८) वरील कारणांस्तव तक्रारदार हे निश्चित कालावधीत नविन वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत. प्रतिक्षा यादीत त्यांचा क्रमांक बराच खाली आहे. या कारणा वरुन त्यांची तक्रार अमान्य करता येत नाही.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार श्री अमोल शिवाजी माने, मु.पो. कुडनूर ता. जत जि. सांगली यांना शेती पंपासाठी त्यांच्या मागणी अर्जाप्रमाणे नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. ३१.०८.२०१७ पर्यन्त द्यावी असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) तक्रारदार यांची भरपाईची मागणी सोडून दिल्यामुळे ,रद्द करण्यात येते.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |